प्रश्न - शाहिरी वाङ्मय म्हणजे काय ? ते सांगून शाहिरी वाङ्मयाचे स्वरूप स्पष्ट करा ?

→ प्रस्तावना -

मराठी शाहिरी वाङ्मयाचा काळ हा मोरेपंतांच्या वेळेपासून सुरू झाला. पोवाडे व लावण्या हे ह्या काव्याचे प्रमुख प्रकार होत. प्राचीन मराठी वाङ्मयामध्ये संत, पंत आणि तंत असे तीन संप्रदाय निर्माण झाले. 'तंत' परंपरेतून जी वाङ्मय रचना झाली, ती अस्सल मराठमोळी आहे. तत्कालीन समाजजीवनाचे चित्रण पारंपारिक शाहिरी कवितेतून पहावयास मिळते. शाहिरी वाङ्मय हा मराठी सारस्वतातील एक महत्वाचा वाङ्मय प्रकार आहे. विषय, आशय आणि रचनेच्या वैशिष्ट्यामुळे या वाङ्मयाचे वेगळेपण नजरेत भरते. शाहिरी वाङ्मयाचे स्थान मराठी वाङ्मयामध्ये केवळ मनोरंजनाचे नाही. पारंपारिक शाहिरी वाङ्मयामधून व्यक्त झालेले भौतिक अंग आणि मनोरंजनात्मक अंग तसेच समाजजीवन हे अभ्यासनीय आहे. पारंपारिक वाङ्मयाची निर्मिती ही खऱ्या अर्थाने 1680-1800 या दरम्यान भरभराटीला आलेली दिसते. शिवकालीन आणि पेशवेकालीन कालखंडात घडलेल्या घडामोडींचे, आचार, विचारांचे, सामाजिक, धार्मिक आणि राजकीय परिस्थितीचे जिवंत चित्रण आपल्याला पारंपारिक शाहिरी कवितेतून पहावयास मिळते.

* शाहिरी वाङ्मय म्हणजे काय ?

'शाहिरी वाङ्मय' हा प्रकार पोवाडा व लावणी हे दोनही प्रकार एकत्र येऊन झालेला आहे. पोवाडा व लावणी मिळून शाहिरी वाङ्मयप्रकार अस्तित्वात आला आहे. पोवाडा सादर करणारे मराठमोळ्या पद्धतीचा पेहराव करून, डफाच्या साथीवर पोवाडा सादर करतात. पोवाड्यात प्रामुख्याने देवस्तुती, वीर पुरुषांचे पराक्रम, लढायांची वर्णने गायिली जातात. पोवाड्याची रचना दीर्घ असते, त्यात प्रामुख्याने वीररस असतो. त्याचे स्वरूप निवेदनात्मक असते. लावणी ही पोवाड्यापेक्षा अधिक भावपूर्ण असते. लौकिक जीवनातील भाव-भावनांचे चित्रण त्यात येते. बहुधा ती शृंगारिक असते. त्यात

स्त्री नर्तकी नृत्य, नाट्य, संगीत या गुणांच्या आधारे लावणी सादर करते. ढोलकी, तुणतुणे, वाद्यांची पेटी, मंजिरी या वाद्यांची साथ लावणीला असते.

शाहिर म्हणजे मराठी आणि कवी आणि शाहिरी म्हणजे काव्य. असे म्हणजे शाहिरी काव्य म्हणजे कविता. ह्या वाङ्मय प्रकाराचे मूळ लोकवाङ्मयात आहे. पोवाडा व लावणी रचना करणाऱ्याला शाहिर म्हणतात. शाहिरी वाङ्मय रचनेत शाहिराचे नाव गुंफलेले असते. त्यामुळे शाहिराचे नाव आपल्याला कळते. यामुळे शाहिरी हा 'लौकिक वाङ्मय' प्रकार म्हणून ओळखला जातो. लोकवाङ्मयात रचनाकाराचे नाव किंवा नाममुद्रा नसते. लोकवाङ्मय अनाम असते. म्हणून शाहिरी वाङ्मय हे लोकवाङ्मय नसून लौकिक वाङ्मय आहे.

## * शाहिरी वाङ्मयाचा उगम —

शाहिरी हा मूळचा शायर ह्या अरबी शब्दाचा मराठी शब्द बनलेला आहे. शाहिरी वाङ्मय म्हणजे पोवाडे व लावण्या. यातील पोवाडे हे शिवकालापासून आणि लावण्या ह्या केवळ उत्तर पेशवाईतल्या उपलब्ध असल्यामुळे, पोवाडा हा काव्यप्रकार शिवकालात आणि लावणी हा प्रकार पेशवाईत जन्माला आला, असा गैरसमज दिसतो. पुरावा पुढेमागे उपलब्ध होण्याचा संभव क्षीण असला तरी त्याच्या खुणा प्राचीन वाङ्मयात दिसून येतात. त्यानुसार शोध घेता नागेश संप्रदायाचे शाहिर मन्मथशिवलिंग यांची इ. स. 1600 पूर्वीची 'कुराड्यो भवानीविषयीची लावणी' उपलब्ध झालेली आहे. आज तरी उपलब्ध लावण्यात जुन्यात जुनी हीच लावणी मानावी लागते. आज आपण या मन्मथशिवलिंगाच्या पूर्वी पोवाड्याची रचना केली जात होती, हे "चवदाव्या शतकातील अज्ञानसिद्ध व बहिरपिसाविरचित दोन पोवाडे" या दोन लेखावरून सिद्ध झाले आहे. आज आपण ज्याला शाहिरी वाङ्मय म्हणतो त्याचा प्रवाह अधिक विस्तृत आणि विविधांगी झाला, तो शिवकाळ आणि नंतर उत्तरपेशवाईच्या काळात.

## * शाहिरी काव्याची उद्दिष्टे –

शाहिरी काव्य हा मराठीत अतिशय समृद्ध असा वाङ्मय प्रकार आहे. शाहिरी काव्याच्या अध्यापनाची उद्दिष्टे कोणती आहेत. तर पोवाड्यात पराक्रमाची, तेजस्वितेचा वर्णिलेली असते. ते चारित्र्य, ते कर्तृत्व, ते देशप्रेम, ती निष्ठा तो त्याग यांचे संस्कार विद्यार्थ्यांवर व्हावेत. उपदेशपर व बोधपर लावण्यातून नीती मूल्यांची जोपासना व्हावी. मनोरंजनातून उद्बोधन करणाऱ्या काव्यकलेचा व लोककलेचा परिचय व्हावा. या काव्यातून चित्रित होणाऱ्या राजकीय व सामाजिक स्थितीचे चित्र विद्यार्थ्यांना जाणता यावे. या काव्यातील रचनेचे, आशयाचे, भाषेचे सौंदर्य व स्वरूप जाणता यावे. ही उद्दिष्टे या काव्याच्या अध्यापनातून साधता येतील.

या शाहिरी कवितेच्या प्रेरणा तत्कालीन वीरश्रीचा पराक्रम, विलास, समाजजीवन आणि धार्मिक विधी- परंपरा यांच्यामधूनच निर्माण झालेल्या दिसतात.

## * शाहिरांचे वेगळेपण –

शाहीर हे सर्वसामान्य बहुजन समाजातील असत. ते अडाणी, अशिक्षित असत. तरी शाहीर यांच्या समाजाचे उपदेशक, कवी, नट गायक सर्वकाही असत. पारंपरागतने वाङ्मय जतन करणारे, त्यांचा गोंधळ, शेतकरी, कामकरी, शिपाईगडी आणि इतर बोलीभाषा बोलणारे. शाहिरांचे कार्यक्रम गावच्या चव्हाट्यावर, देवळांच्या सावलीत, हातेच्या ठिकाणच्या मोकळ्या जागेत. बाजाराच्या ठिकाणी होत असत. शाहिरांच्या कार्यक्रमाचे स्थळ सर्वांना मोकळे होते / असत.

शाहिरांची तशी मूळ प्रेरणा गाणाऱ्यांचे आणि ऐकणाऱ्यांचे मनोरंजन करण्याची होती. ते ज्या आणि लोकसमूहातून घडले होते, त्या समूहमनातील भाव-भावनांचे चित्र आपल्या वाङ्मयातून लोकांपुढे ते उभे करीत. मराठ्यांच्या जीवनाचे आणि भाव-

भावनांचे अस्सल रसभरीत चित्रण करणे हेच शाहिरांचे जीवितकार्य आहे.

## * शाहिरी वाङ्मय : जडणघडण —

सतराव्या शतकात मराठी काव्याला शब्दलालित्य, पदलालित्य, आणि भाव सौंदर्य याचा फुलोरा येत होता. या काळामध्ये लढायाही वारंवार झाल्या. तेव्हा शाहिरांनी सैनिकांना प्रेरणा देण्यासाठी वीररसात्मक काव्य लिहिले. शाहिरी करणारे शाहिर सर्व जाती-जमातीचे होते. शाहिर रामजोशी, प्रभाकर हे ब्राह्मण, तर परशराम शिंपी, होनाजी गवळी, सगनभाऊ, शाहिर अमरशेख मुसलमान, कोळि न्हावी, कोणी रंगारी आहेत्या उल्लेख करावा लागेल. वामन पंडितासारखे गीतेवर रचना लिहिणारे विद्वानही लावणी रचना करताना दिसतात.

महाराष्ट्रातील सर्व भुभागात शाहिरी निर्माण होत होती आणि आजही आहे. अनंत फंदी हे संगमनेरचे, तर होनाजी पुण्याचे, शाहिर परशराम नाशिकजवळील वावीचे, रामजोशी सोलापूरचे, असे कितीतरी शाहिर सांगता येतील. शाहिर अमरशेख यांनी स्वातंत्र्यमुद्यात राष्ट्रीय पोवाडा गाऊन लोकजागृती केली.

## सारांश —

शाहिरी वाङ्मय हे लोकजीवनातून निर्माण झालेले आणि तत्कालीन लोकांच्या जीवनावर प्रकाश टाकणारे आहे. म्हणजे शिवकालीन आणि पेशवेकालीन कालखंडातील चालीरीति, रीतिरिवाज, परंपरा व सामाजिक, राजकीय, धार्मिक परिस्थिती यांचे वर्णन पारंपारिक शाहिरी कवितेतून पहावयास मिळते. पोवाडा निवेदनासाठी तर लावणी भावना आविष्कारासाठी असते. दोन्ही प्रकार गाण्याचे आणि ऐकण्याचे आहेत. शाहिरी परंपरेचा उगमकाळ प्रत्यक्ष उपलब्ध पुराव्यांनी संत ज्ञानेश्वरानंतरचा असे सांगता येते.